शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित,
कायम विनाअनुदानित महाविद्यालये
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबतचे डॉ. विजय नारखेडे शिक्षणसह संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/७१०७ दि. २३/०५/२०१९ रोजीचे तात्काळ अत्यंत महत्त्वाचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/३११
दि. २४.०५.२०१९

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ ७१०७ दि. २३/०५/२०१९

23 MAY 20..

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...**

संदर्भ :- १. माहिती तंत्रज्ञान विभाग यांचा दि. १७.०५.२०१९ रोजीचा इमेल.
२. संचालनालयाचा दि. १८.०५.२०१९ रोजीचा इमेल.

उपरोक्त विषयाबाबत माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. १७.०५.२०१९ रोजीच्या इमेलनुसार, सन २०१८-१९ मधील शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करणेसाठी **शैक्षणिक संस्थांना दि. २१.०५.२०१९ ते २५.०५.२०१९ (०५ दिवस) आणि विभागासाठी दि. २१.०५.२०१९ ते २७.०५.२०१९ (०७ दिवस)** सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, अशा प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी संबंधित शैक्षणिक संस्था तसेच विभाग यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबत संचालनालयाच्या दि. १८.०५.२०१९ रोजीच्या इमेलनुसार सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना संबंधित संस्थांना सूचना देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तथापि अद्यापही खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | संस्था स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | रीडीम न केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | 94 | 6 | 194 |
| २ | औरंगाबाद | 463 | 17 | 1,474 |
| ३ | जळगांव | 552 | 11 | 327 |
| ४ | कोल्हापूर | 123 | 14 | 2,511 |
| ५ | मुंबई | 44 | 2 | 108 |
| ६ | नागपूर | 146 | 4 | 126 |
| ७ | नांदेड | 223 | 9 | 857 |
| ८ | पनवेल | 76 | 8 | 159 |
| ९ | पुणे | 565 | 43 | 1,401 |
| १० | सोलापूर | 87 | 5 | 488 |
| | **एकूण** | **2373** | **119** | **7,645** |

प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्‌भवणाऱ्या बाबीस संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील. सदरची बाब आपल्या विभागातील सर्व अकृषि विद्यापीठे तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. इन्स्टिट्युट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. याची नोंद घ्यावी. महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

(डॉ. विजय नारखेडे)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

O/S
23.5.19

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.